क्र.अपामस/प्राश-२/Module for E-Learning/९१७/२०१८/२४५२
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-
दिनांक- /०९/२०१८
04 OCT 2018

**संदर्भ :- संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांचे पत्र क्र. मपोअ./**
**ई- लर्निंग/५४२३/२०१८ दि. ०५/०९/२०१८**

**विषय :- राज्यातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी ई लर्निंग प्रशिक्षण महिन्यास किमान ३ तास अनिवार्य करणेबाबत.**

*****

उपरोक्त संदर्भ व विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप व गुन्हयांच्या तपासाचे दृष्टीकोनातुन मार्गदर्शन प्राप्त होणे तसेच प्रशिक्षण देणे इत्यादीसाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे ई-लर्निंग प्रशिक्षण दिले जाते. सदर प्रशिक्षण Online स्वरुपाचे असल्याने पोलीस अधिकारी / पोलीस कर्मचारी स्वत:चे कर्तव्याचे ठिकाणाहुन प्रशिक्षण पुर्ण करु शकतात. पोलीस अधिकाऱ्यांना गुन्हे तपास, कायदा व सुव्यवस्था, सायबर व फॉरेन्सीक गुन्हे पध्दती व तपास पध्दत माहिला व बाल गुन्हेगारी तपास इत्यादी व यासारख्या विषयावर अद्ययावत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ई-लर्निग प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. सबब सर्व घटकप्रमुखांना विनंती आहे की, खालील नमूद बाबीचे कृपया काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१. पोलीस अधिकारी /पोलीस कर्मचारी यांना महिन्यातुन ३ तास ई-लर्निग प्रशिक्षण पुर्ण करणे अनिवार्य आहे.
२. ई-लर्निंग प्रशिक्षण व परिक्षा उत्तीर्ण झालेल्या पोलीस अधिकारी / पोलीस कर्मचारी यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल सदर प्रमाणपत्राची नोंद संबधितांचे गोपनिय अभिलेख/ सेवापटामध्ये केली जाईल.
३. पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची माहिती विहीत विवरणपत्रात भरुन महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांचे ई-मेल आयडी nodalofficer@mpanashik.gov.in वर Soft Copy सह पाठविण्यात यावी

**(पोलीस महासंचालक यांचे मान्यतेने)**

03/10/18
(संजय सक्सेना)
अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य.मुंबई.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.
प्रत ,
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
प्रत सादर,
पोलीस महासंचालक, म. राज्य मुंबई.